**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ फेब्रुवारी २०१५

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए -०८१३/ प्र.क्र.-१४१/राउशु २.—ज्या अर्थी महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये सुधारणा करण्यास व ते तात्काळ अंमलात आणण्याचे ठरविले आहे व त्या अर्थी ते प्रसिद्ध न करता महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम १४३ च्या उप कलम (३) च्या परंतुकानुसार पूर्वीच्या प्रकाशनाचा वापर न करता प्रसिद्ध करण्यात यावेत.

उक्त महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम १४३ च्या उप कलम (२) च्या खंड (*b*) (*f*) आणि (*k*) द्वारे आणि इतर सर्व अधिकारांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तयार करीत आहे ते असे.—

१. या नियमांना महाराष्ट्र देशी मद्य (सुधारणा) नियम, २०१५ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ च्या नियम, २४ मध्ये (यापुढे यास प्रधान नियम असे संबोधावे)

(*i*) उपनियम (४) मध्ये, खंड (*b*) मध्ये " कोणत्याही शैक्षणिक किंवा धार्मिक संस्थापासून " या शब्दांनंतर " किंवा कोणताही राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांचा पुतळा " हे शब्द समाविष्ट करावे.

(*ii*) परंतुकामध्ये " महाराष्ट्र देशी मद्य (सुधारणा) नियम, १९८१ " या शब्दांनंतर " महाराष्ट्र देशी मद्य (सुधारणा) नियम, २०१५ " या शब्दांचा समावेश करण्यात यावा.

(*iii*) स्पष्टीकरणा मध्ये :—

(*iv*) (*a*) परिच्छेद (*iii*) मध्ये,—

(*v*) (१) खंड (*b*) मध्ये " किंवा वाहनतळ " या शब्दांऐवजी " किंवा वाहनतळ किंवा " हे शब्द अंतर्भूत करावे.

(२) खंड (*b*) नंतर पुढील खंडाचा समावेश करण्यात यावा, तो असा.—

(*c*) जर संरक्षक भिंत असल्यास पुतळ्याजवळील प्रवेशद्वाराचा मध्य बिंदू आणि जर संरक्षक भिंत नसल्यास पुतळ्याच्या चौथऱ्याचा मध्य बिंदू ".

(*b*) परिच्छेद (*iii*) नंतर पुढील परिच्छेद समाविष्ट करावा.—

(*iv*) " राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांचा पुतळा " म्हणजे शासन मान्यताकृत असलेला कोणताही राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांचा पुतळा जो या नियमा सोबतच्या अधिसूची मध्ये विषद करण्यात आलेला आहे. ".

३. प्रधान नियमामध्ये फॉर्म सी. एल. XXV नंतर पुढील अधिसूचि अंतर्भूत करण्यात यावी, ती अशी,—

**" अधिसूची**

(नियम २४ पहावा)

**राष्ट्रीय व्यक्तीमत्वाचे पुतळे**

१. महात्मा फुले

२. लोकमान्य टिळक

३. महात्मा गांधी

४. पंडीत जवाहरलाल नेहरु

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

६. विनोबा भावे

७. संत तुकडोजी महाराज

८. स्वातंत्रवीर सावरकर

९. स्वामी रामानंद तिर्थ

१०. इंदिरा गांधी

११. छत्रपती शिवाजी महाराज

१२. नेताजी सुभाषचंद्र बोस ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

**अं. शा. घार्गे,**
शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 25 February 2015.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BPA.0813/CR141/ EXC-2.—Whereas the Government of Maharashtra is satisfied that the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, should be brought into force at once, and therefore, the rule should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act, (XXV of 1949).

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (*b*), (*f*) and (*k*) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973 as follows :—

1. These rules may be called the Maharashtra Country Liquor (Amendment) Rules, 2015.

2. In rule 24 of the Maharashtra Country Liquor Rules, 1973 (hereinafter referred to as "the principal Rules")

(*i*) in sub-rule (4), in clause (*b*), after the words "from any educational or religious institution " the words " or any Statue of National Personality " shall be inserted;

(*ii*) in the proviso, after the words, brackets and figures " the Maharashtra Country Liquor (Amendment) Rules, 1981" the words, brackets and figures "and the Maharashtra Country Liquor (Amendment) Rules, 2015" shall be added;

(*iii*) In the Explanation, -

(*a*) in para (*iii*),-

(*1*) in clause (*b*) , for the words " or depot." the words "or depot, or" shall be substituted;

(*2*) after clause (*b*) , the following clause shall be added, namely :-

" (*c*) the mid-point of the nearest gate of the Statue, if there is a compound wall, and if there is no compound wall, the nearest point of foundation of such a Statue."

(*b*) after para (*iii*) , the following para shall be added, namely :-

"(*iv*) "Statue of National Personality" means any statue of the National Personality recognized by the Government specified in the Schedule appended to these rules."

3. In the principal Rules, after Form C.L. XXV, the following Schedule shall be added, namely:—

*" Schedule*

(*see* rule 24)

*National Personality*

1. Mahatma Phule,
2. Lokamanya Tilak,
3. Mahatma Gandhi,
4. Pandit Jawaharlal Nehru,
5. Dr. Babasaheb Ambedkar,
6. Acharya Vinoba Bhave,
7. Sant Tukadoji Maharaj,
8. Swatantraveer Savarkar,
9. Swami Ramanand Teerth,

10. Indira Gandhi,
11. Chhatrapati Shivaji Maharaj,
12. Netaji Subhashchandra Bose."

By order and in the name of the Governor of Maharashtra.

A. S. GHARGE,
Joint Secretary to Government.